# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**
**बुधवार, दिनांक १३ मार्च, २०१३**
**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे:-**

**महिला व बालविकास मंत्री** : सन २०१२ च्या प्रथम अधिवेशनात दिनांक ९ एप्रिल, २०१२ रोजी अर्थसंकल्पीय मागण्यांवरील चर्चेच्यावेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**तीन : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).**

**चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(दिनांक १२ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली, परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना - क्रमांक १)**

(१) **सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार,** जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे, विलास लांडे, लक्ष्मण जगताप, कृषिभूषण साहेबराव पाटील, गोपाळ शेट्टी, योगेश सागर, बाळा नांदगावकर, अमीन पटेल, बाबा सिद्धीकी, संजय भेगडे, पंकज भुजबळ, ॲड. अशोक पवार, सर्वश्री. रमेश थोरात, गणपत गायकवाड, दिलीप वाघ, संजय सावकारे, मंगेश सांगळे, गिरीश बापट वि.स.स.पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम ( सार्वजनिक उपक्रम ) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर सात वर्षांत ३४६४ अपघात झाल्याची धक्कादायक माहिती माहे फेब्रुवारी २०१३ मध्ये उघडकीस येणे, यातील ६१२ अपघातांमध्ये ८४१ प्रवाशांना आपले प्राण गमवावे लागणे, द्रुतगती महामार्गावर वेगाने धावणाऱ्या वाहनांवर कारवाई करून अपघातांचे प्रमाण काही अंशी कमी झाले असले तरी बळींची संख्या मात्र अपघातांच्या दुप्पट वाढणे, सिनेकलावंत, बिझनेसमन, राजकारणी, शासकीय अधिकारी यांची या मार्गावर सतत ये-जा असणे, माहे डिसेंबर २०१२ मध्ये सिनेअभिनेते आनंद अभ्यंकर आणि अक्षय पेंडसे यांचा याच द्रुतगती महामार्गावर अपघातात मृत्यू होणे, तसेच अमेय राणे व भालचंद्र कदम यांचाही अपघात होऊन ते गंभीर जखमी होणे, या घटनाक्रमांचा विचार करता शासनाकडे पाठविण्यात आलेल्या अपघातस्थळांच्या

अहवालाबाबत अद्यापही कोणताच निर्णय शासनाकडून झालेला नसणे, उंचीचे रस्ता दुभाजक बांधणे, पोलिस चौक्या वाढविणे, सीसीटीव्ही कॅमेरे लावणे, गावांकडून येणाऱ्या चोरवाटा बंद करणे यापैकी कोणत्याही प्रकारची कामे अद्याप न होणे, त्यामुळे एक्सप्रेस वे वर लोक जीव मुठीत घेऊन प्रवास करीत असणे, याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने याप्रकरणी तातडीने निर्णय घेऊन करावयाची योग्य ती कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया".

(२) **सर्वश्री. एकनाथराव खडसे (पाटील),** योगेश सागर, कालीदास कोळंबकर, बाळा नांदगावकर, पंकज भुजबळ, प्रकाश भोईर, शिशिर शिंदे, राम कदम, मंगेश सांगळे, प्रविण दरेकर, रमेश पाटील, नितीन सरदेसाई, प्रशांत ठाकूर, अमीन पटेल, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"नवी मुंबई खारघर येथील ओवे गावात बांगलादेशी घुसखोरांना पकडण्यासाठी गेलेल्या गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलीस पथकावर वीस जणांच्या जमावाने सळ्या व काठ्यांनी हल्ला करून ८ जणांना पळवून नेण्याची दिनांक २६ फेब्रुवारी, २०१३ रोजी घडलेली घटना, सदरहू हल्यात पोलीस निरिक्षकासह दोन पोलीस गंभीर जखमी होणे, पोलीसांनी काही बांगलादेशी घुसखोरांना ताब्यात घेतल्यानंतर त्यांना सोडविण्यासाठी घुसखोरांनी पोलिसांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न करून दगडफेक करून हल्ला करणे, तथापि सदरहू हल्लेखोर घुसखोरांना अद्यापही अटक करण्यात पोलिसांना आलेले अपयश, राज्यात होणाऱ्या वाढत्या दहशतवादी कारवायांमध्ये त्यांचा सहभाग असल्याचा व्यक्त होत असलेला संशय, पोलिसांवरच घुसखोरांनी हल्ला केल्यामुळे तेथील जनतेमध्ये निर्माण झालेली भीती व असुरक्षिततेची भावना, त्यामुळे पोलिसांनी त्या घुसखोर हल्लेखोरांना तात्काळ अटक करण्याची जनतेने केलेली मागणी, त्यामुळे पलायन केलेल्या बांगलादेशी घुसखोर हल्लेखोरांचा तातडीने शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची व राज्यात इतरत्र भागातही असलेले बांगलादेशी घुसखोर अथवा अवैधपणे राहणाऱ्या नागरिकांना तातडीने शोधून त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी मोहिम राबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई"

(३) **श्री. नाना पटोले,** डॉ. खुशाल बोपचे, सर्वश्री प्रकाश शेंडगे, अमीन पटेल, बाबा सिध्दीकी, विजय वडेट्टीवार, सुभाष झनक, सुधाकर देशमुख, देवेंद्र फडणवीस, विकास कुंभारे, कृष्णा खोपडे, संभाजी पवार, श्रीमती प्रणिती शिंदे **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यातील ओ.बी.सी. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची १४,००० कोटींची फी प्रलंबित राहिल्याने १० लाख विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची धक्कादायक बाब निदर्शनास येणे, सर्व ओ.बी.सी. विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना असणे, त्यात भटक्या जाती-जमाती, विशेष मागास प्रवर्गाचा समावेश असणे, राज्य शासनाने आधी शिष्यवृत्तीची रक्कम द्यायची आणि नंतर केंद्र शासनाने त्याची प्रतिपूर्ती करावी, अशा प्रकारच्या योजनेचे स्वरूप असणे, १० लाख ओ.बी.सी. विद्यार्थ्यांपैकी ३,३४,००० विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती व ५५ हजार विद्यार्थ्यांच्या शुल्क माफीची ३२७ कोटींची रक्कम अद्यापही मिळालेली नसणे, आगामी शैक्षणिक वर्षासाठी शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क यास ६०० कोटी रूपयांची आवश्यकता असणे, राज्याच्या अर्थसंकल्पात केवळ ४७० कोटी रूपयांचीच तरतूद करण्यात येणे, राज्य शासन ही योजना पुढे सुरू ठेवेल की बंद करेल याबाबत पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण होणे, ओ.बी.सी. विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची थकबाकी मिळावी यासाठी शासनाने सातत्याने पाठपुरावा न करणे, राज्यातील १० लाख ओ.बी.सी. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य शिष्यवृत्तीवर अवलंबून असणे, शैक्षणिक सत्र सुरू होवूनही थकबाकी न दिल्याने शाळा, कॉलेज, महाविद्यालय यांचेकडून विद्यार्थ्यांना वेठीस धरण्यात येणे, शासनाची ओ.बी.सी. शिष्यवृत्ती योजना मोडीत काढण्याचा डाव असणे, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या शुल्क प्रतीपूर्ती व शिष्यवृत्ती योजनांचे फायदे घेण्यासाठी अल्प मुदतीचे व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या विदर्भातील अनेक खाजगी शिक्षणसंस्था बनावट विद्यार्थी दाखवून राज्य व केंद्र शासनाकडून कोट्यवधी रुपये उकळत असणे व याप्रकरणी सुरु असलेला गैरव्यवहार नागपूर येथील समाजकल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त कार्यालयाने माहे जानेवारी, २०१३ वा त्यासुमारास उघडकीस आणणे, परिणामी राज्यात अल्प मुदतीचे अभ्यासक्रम चालविणाऱ्या ४३८ संस्थांची सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, ओ.बी.सी. नॉन क्रिमी लेयरची उत्पन्न मर्यादा ७ लाख रुपये करण्याबाबत तसेच ई.बी.सी. सवलतीकरिता उत्पन्न मर्यादा ४.५० लाख इतकी करण्याची वारंवार होत असलेली मागणी, ओ.बी.सी. विद्यार्थ्यांमध्ये शासनाच्या चुकीच्या धोरणाविषयी तीव्र स्वरूपाचा असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, त्यामुळे येथील जनतेत पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण व त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत- मध्यंतर )**

सहा : **सर्वश्री. एकनाथराव खडसे (पाटील), सुभाष देसाई, गणपतराव देशमुख, गिरीष बापट, रविंद्र वायकर, देवेंद्र फडणवीस, संभाजी पवार, नाना पटोले, श्रीमती. मिनाक्षी पाटील, सर्वश्री. आर. एम. वाणी, गिरीष महाजन, सुधाकर भालेराव, प्रा. राम शिंदे, सर्वश्री. प्रकाश शेंडगे, सुधीर मुनगंटीवार, अबु आजमी, बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई, वसंत गिते, शिशिर शिंदे, प्रविण दरेकर, रमेश पाटील, प्रकाश भोईर, मंगेश सांगळे, उत्तमराव ढिकले, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व उत्तर)**

"राज्यात अत्यल्प पावसामुळे निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे संपूर्ण राज्यात दुष्काळ जाहीर करुन त्याप्रमाणे आवश्यक त्या उपाययोजना न करता शासनाने राज्यातील फक्त ७०६४ गावांमध्ये दुष्काळ जाहीर करणे, दुष्काळाचे सावट गडद झाले असताना रब्बीची पीकेही नष्ट होण्याच्या मार्गावर असणे, राज्यात दुष्काळाची भयानक स्थिती निर्माण होऊन गत वर्षाच्या तुलनेत दि.८ मार्च २०१३ पर्यंत राज्यातील धरणांमध्ये फक्त ३७ टक्के इतका अत्यल्प तर मराठवाड्यात केवळ ९ टक्केच पाणी साठा उपलब्ध असल्यामुळे ग्रामीण भागासमवेत शहरी भागातही पाण्याची भीषण टंचाई निर्माण होणे, शासनाने पिण्याच्या पाण्यासाठी आवश्यक तेवढा टँकरद्वारे पाणी पुरवठा न करणे, दुष्काळग्रस्त भागात जनावरांसाठी पुरेश्या चाऱ्याच्या छावण्या न उभारणे, जुन्या आणेवारी पद्धतीमुळे दुष्काळी परिस्थितीत पिकांच्या झालेल्या नुकसानीची शेतकऱ्यांना पुरेशी नुकसान भरपाई न मिळणे, शासनाने पाण्याच्या टंचाईमुळे निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना व आर्थिक तरतूद न करता केंद्र शासनाकडे सादर केलेल्या रु.२२०० कोटी आर्थिक मदतीच्या प्रस्तावातील त्रुटींमुळे केंद्र शासनाकडून योग्य तो भरीव निधी न मिळता केवळ ७७८ कोटीच रक्कम प्राप्त होणे, दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आलेल्या केंद्रीय पथकाकडे विभागीय आयुक्तांनी मराठवाड्याला १२०० कोटी रुपये देण्याची केलेली मागणी, दुष्काळाच्या करावयाच्या उपाययोजना व निधीवरुन मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये मंत्र्यांमध्ये रोहयोचा निधी उपलब्ध न होणे, वीज बिलाची थकबाकी, धरणातून पिण्यासाठी, शेतीसाठी व उद्योगांसाठी पाणी देताना होत असलेला पक्षपातीपणा इ. विषयांवर त्यांच्यामध्ये खडाजंगी होणे, शासनाने रोहयोच्या मजुरीत केलेली किरकोळ वाढ, दुष्काळ व पाणी टंचाई याबाबत योग्य त्या उपाययोजना करण्यात शासनाला आलेले अपयश तसेच माहे फेब्रुवारी २०१३ मध्ये उत्तर महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, कोकण व पश्चिम महाराष्ट्रात गारपीट व अवकाळी पावसामुळे केळी, द्राक्ष, आंबा, हरभरा, ज्वारी, गहू, संत्री या पिकांचे व बागायतीचे कोट्यवधी रुपयांच्या झालेल्या नुकसानीबाबत शासनाने अद्यापि कोणतीही मदत जाहीर न करणे, कोकण विभागात वणव्याच्या आगीमुळे आंबा इत्यादी फळपीके भस्मसात होणे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी व लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे मदतीची मागणी करुनही त्याकडे शासनाने केलेले दुर्लक्ष, राज्याच्या दुष्काळी भागात शेतकऱ्यांनी शासनाच्या मदतीअभावी आत्महत्या करणे, परिणामी जनतेमध्ये शासनाबद्दल निर्माण झालेला तीव्र

असंतोष व संतापाची भावना, दुष्काळी भागातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणे तसेच रखडलेल्या सिंचनाच्या योजना पूर्ण करणे इत्यादी उपाययोजना करण्याची आवश्यकता, भविष्यात पाणी टंचाईमुळे जनतेमध्ये पाण्यावरुन उद्रेक होऊन दंगली होण्याची पोलिसांनी शासनाकडे व्यक्त केलेली भीती, परिणामी राज्यातील दुष्काळी परिस्थिती व पाणी टंचाई लक्षात घेता कमी होत चाललेला पाणी साठा व आगामी जूनपर्यंतच्या कालावधीमध्ये पाण्याअभावी सर्वच बाबतीत म्हणजेच मानवी जीवन, शेती, जनावरे, पशुखाद्य, अन्नधान्य इ. बाबतीत निर्माण होणाऱ्या भयानक परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाने तातडीने संपूर्ण राज्यात दुष्काळ जाहीर करुन त्याच्या निकषाप्रमाणे योग्य त्या उपाययोजना करण्याची व अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची आवश्यकता."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १२ मार्च, २०१३.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.